# ॥ आत्मा मालिक ॥



सर्व आत्मप्रेमी भाविकांना
**आत्मा मालिक**
**गुरूपौर्णिमा महोत्सव**
निमित्त
**हार्दिक शुभेच्छा!**

**ध्यान म्हणजे नि:शब्द ज्ञानाचा अभ्यास**

**नि:शब्द ज्ञान म्हणजे आत्मज्ञान**

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक
॥ॐ गुरुदेव॥

# आत्मा मालिक

जुलै-२०२४

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''
# मासिक ॐ गुरुदेव
वर्ष २३ वे अंक ७ वा जुलै २०२४  ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - श्रीगुरूंचे शिष्याभिसरण - संत परमानंद महाराज ४
भगवान श्रीकृष्णकथित श्रीसद्‌गुरूमहिमा -डॉ. विजय बाणकर ७
संत तुकाराम महाराजांची सद्‌गुरुनिष्ठा - नामदेव सदावर्ते १०
अंतरंग मार्गदर्शक सद्‌गुरू -बंडोपंत कुलकर्णी १५
गुरु गुण लिखा न जाय... - डॉ. सुनील शिंदे १७
परब्रह्म स्वरुप श्रीगुरू -बी. के. गायकवाड २१
आध्यात्मिकता और आज का दौर -नीता यादव २४

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## संपादकीय

## श्रीगुरूंचे शिष्याभिसरण



गुरू म्हणजे जो लघु नाही तो आणि जो लघुला गुरू बनवतो. गुरू साधकाच्या, शिष्याच्या जीवनाचा नकाशा म्हणून कार्य करतो. ज्याच्या जीवनप्रवसात गुरूरुपी नकाशा आहे, तो जीवनाचा भवसागर पार केल्याशिवाय राहत नाही. परीस लोखंडाचे सोने बनवतो पण स्वतः सारखा परीस बनवित नाही. गुरू तर शिष्याला स्वतःचे गुरुत्व देवून शिष्याला स्वतःच्या प्रतिमूर्ती रुपात तयार करतो. 'आपणासारखे करिती तात्काळ' या न्यायाने गुरूच्या चित्तरूधिरातून केवळ शिष्याभिसरणच चालू राहते. अशाच गुरुशिष्यांच्या जोड्या विश्वपरंपरेत, गुरुपरंपरेत शोभून दिसतात. म्हणूनच राम-लक्ष्मण गुरू विश्वामित्र, वसिष्ठांच्या सेवेत गुंतलेले दिसतात. संजीवनी विद्या प्राप्त करणारा कच शुक्राचार्यांच्या, शुक्राचार्य जनकाच्या तर जनक याज्ञवल्क्याच्या मार्गाने जाताना दिसतात.

**-संत परमानंद महाराज**

**आ**जच्या भारतीय संस्कृतीला महान मानववंशाचे, त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेचे योगदान आहे. रानटी अवस्थेकडून सुसंस्कृत अवस्थेकडे होणारी वाटचाल म्हणजे सकल मानवाचा इतिहास आहे. शास्त्रीय निकषांवर मानवाच्या इतिहासाच्या प्रागैतिहासिक काल, इतिहासपूर्वकाल आणि ऐतिहासिक काल अशा तीन अवस्था मानल्या गेल्या. या प्रत्येक अवस्थेत मानवाने आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष केला. प्राचीन भारतातील मानवाच्या सर्वांगीण प्रगती व समृध्दतेचा कालखंड म्हणून सिंधू संस्कृतीचा कालखंड मानला जातो. हडप्पा व मोहेंजोदडो या नगरांच्या उत्खननात सापडलेल्या साधनांवरुन या काळातील मानवी जीवनांचा व कुटुंब व्यवस्थेचा, सामाजिक व सांस्कृतिक स्तर लक्षात येतो. रामायण व महाभारत या दोन महाकाव्यांनी भारतीय समाजमनावर आपला प्रभाव पाडला. श्री रामाच्या रुपाने एक आदर्श पुत्र, आदर्श राजा, पती, रक्षक असे अनेक आदर्श निर्माण झाले. महाभारतात कौरव-पांडवांची कथा असून, श्रीकृष्णाचे शांतिदूत म्हणून महत्वपूर्ण काम आहे. गीतेद्वारे श्रेष्ठमय ज्ञान उपलब्ध आहे. श्रेष्ठ राजव्यवस्था, श्रेष्ठ समाजव्यवस्था व श्रेष्ठ कुटुंबव्यवस्थेचे जणू प्रात्यक्षिकच या धर्म ग्रंथाच्या माध्यमातून उपलब्ध झाले आहे. हा सर्व स्वर्णिम इतिहास, इतके दैदिप्यमान रचनात्मक कार्य कसे घडले असेल? श्रीकृष्ण तर **'कृष्णम् वंदे जगद्गुरुम्'** या विश्वात्मक विश्वव्यापक परमोच्च पदापर्यंत जाऊन पोहचले. हा बहुमान खचितच कुणाला मिळतो. गीतेचे तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहचवून 'जगद्गुरू' या ध्रुवपदावर आरूढ झालेले साक्षात भगवान श्रीकृष्णदेखील 'मी सांदिपनींचा शिष्य आहे!' हे सांगण्यात स्वतःचा गौरव मानीत होते. जो संपूर्ण विश्वाचा गुरु 'जगतगुरू' आहे, त्याचाही कोणीतरी गुरू आहे. अशा गुरुचे पूजन हे भारतीय संस्कृतीचे अलौकिक, सुमधूर व भावार्द्र काव्य आहे. कृतज्ञतेची ही ठेव हेच या स्वर्णिम इतिहासाचे दैदिप्यमान रचनात्मक कार्याचे खरे कार्यकारण आहे.

आषाढ शुद्ध पौर्णिमा ही भारतीय संस्कृतीमध्ये व्यास पूजेचा दिवस म्हणून ओळखली जाते. या दिवशी संस्कृतीला महान बनवणाऱ्या व संस्कृतीचे यशस्वी संक्रमण करणाऱ्या ऋषींचे, अर्थात् आपल्या

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

संस्कृतीला पाचवा वेद म्हणून ज्याला गौरविण्यात येते, असा संस्कृतीचा महान ज्ञानकोष 'महाभारता' सारखा ग्रंथ ज्यांनी दिला, त्या वेदव्यासांच्या पूजनाचा कृतज्ञता दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा! वेदव्यासांच्या माध्यमातून श्रीकृष्णाचे तत्वज्ञान अमर बनविण्यासाठी संस्कृतीचा प्रचार, प्रसार, चिंतन व ध्यान करणाऱ्या प्रत्येक पीठाला 'व्यासपीठ' असे संबोधन रूढ झाले. व्यासपीठावरुन जो विश्वकल्याणासाठी नि:स्वार्थ भावाने कार्य करतो, स्वत:चे जीवन व्रतस्थ करुन वेदमान्य, व्यासमान्य विचारांच्या प्रचार- प्रसारासाठी विविध मार्गाने कार्य करुन समाजाचा उद्धार करतो, अशा गुरुंच्या पूजनाचा हा दिवस.

गुरू म्हणजे जो लघु नाही तो आणि जो लघुला गुरू बनवतो. गुरू साधकाच्या, शिष्याच्या जीवनाचा नकाशा म्हणून कार्य करतो. ज्याच्या जीवनप्रवसात गुरूरुपी नकाशा आहे, तो जीवनाचा भवसागर पार केल्याशिवाय राहत नाही. परीस लोखंडाचे सोने बनवतो पण स्वत: सारखा परीस बनवित नाही. गुरू तर शिष्याला स्वत:चे गुरुत्व देवून शिष्याला स्वत:च्या प्रतिमूर्ती रुपात तयार करतो. 'आपणासारखे करिती तात्काळ' या न्यायाने गुरूच्या चित्तरूधिरातून केवळ शिष्याभिसरणच चालू राहते. अशाच गुरुशिष्यांच्या जोड्या विश्वपरंपरेत, गुरुपरंपरेत शोभून दिसतात. म्हणूनच राम-लक्ष्मण गुरू विश्वामित्र, वसिष्ठांच्या सेवेत गुंतलेले दिसतात. संजीवनी विद्या प्राप्त करणारा कच शुक्राचार्यांच्या, शुक्राचार्य जनकाच्या तर जनक याज्ञवल्क्याच्या मार्गाने जाताना दिसतात. कृष्ण-सुदामा सांदिपनींच्या आश्रमात रमताना दिसतात. अर्जुन द्रोणाचार्यांशी गुजगोष्टीत रत दिसतो, तर कर्ण परशुरामाची अग्निपरीक्षा देण्यातही धन्यता मानतो. 'मी सॉक्रेटिसचा शिष्य आहे' हे प्लेटो अभिमानाने सांगतो, तर 'प्लेटो माझा गुरू आहे' याचा कृतज्ञ भाव मिरवण्यात ॲरिस्टॉटल धन्यता मानतो. खरेतर या आणि अशाच शेकडो हजारो गुरुपरंपरतेतील गुरू-शिष्यांच्या जीवनातील आजचा दिवस हा खऱ्या अर्थाने आत्महोत्सवाचा दिवस! आत्मविजयाचा दिवस! आत्मपौर्णिमेचा दिवस....!

अशीच आत्मपौर्णिमेची पहाट ज्यांच्यामुळे सकल मानव जीवनात आली. ते प. पू. प्रांत:स्मरणय ओम गुरुदेव माऊली! प. पू. ओम गुरूदेव माऊलींनी सैरभैर झालेल्या माणसांचा हात धरला आणि त्याला बाह्य प्रवासाबरोबरच आंतरिक प्रवासाचा मार्ग प्रशस्त केला. आजपर्यंत कोसो योजने पायाने चालणारा माणूस या भवसागरात केवळ यात्रेचा अनुभव घेत होता. गुरुदेवांनी त्याला हृदयाकडे चालायला शिकविले. आज तो जीवनयात्रेत तीर्थयात्रेचा अनुभव घेतो आहे. वस्तूंवर, पदार्थांवर प्रेम करणाऱ्या आणि आत्मचैतन्यापेक्षा इतर गोष्टींवर जीव टाकणाऱ्या माणसांना गुरुदेव सांगतात **'माणसाचे खरे स्वरुप आत्मा आहे. म्हणूनच त्यांना आत्म्यापेक्षा कमी मौल्यवान गोष्टीसाठी जीव टाकू नये. हे ज्याला जमेल, त्याच्या जीवनात आत्मपौर्णिमेची पहाट उगवल्याशिवाय राहणार नाही.'** आणि म्हणूनच आत्म्याला समजण्यासाठी गरज आहे ध्यानाची. ध्यानातूनच आत्मिक सौदर्यांची जाण आणि भान निर्माण होणार आहे. गुरुदेवांच्या या राजमार्गावरुन, ध्यानमार्गावरुन आज हजारो लाखो जीवनयात्री केवळ देशातच नव्हे तर विदेशातही मोठे श्रद्धापूर्वक ध्यानक्रमण करत आहेत. गुरुदेव सांगतात, प्रत्येक आत्मा हा त्या विश्वात्म्याचा एक अंश आहे. म्हणूनच प्रत्येक आत्मा दुसऱ्या आत्म्याला जोडलेला असतो. प्रत्येक आत्मा, मग तो कोठेही असो, त्याचा सर्व जगाशी संबंध येतो. आत्मा ही अखंड वस्तू आहे. आत्मा हा विश्वात्मक व विश्वव्यापी आहे. महासागारातील अनंत लाटा जशा त्याच महासागराच्या अंश असतात. त्याचप्रमाणे तुमचा, माझा, याचा-त्याचा आपणा सर्वांचा आत्मा हा त्याच विश्वात्म्याचे (परमात्म्याचे) अंश आहे. या अखंडत्वामुळेच विश्वकल्याणासाठी,

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

विश्वशांतीसाठी आपण केलेल्या क्षणभर ध्यानामुळे एक वहिवाट तयार होणार आहे आणि ही वहिवाटच उद्याच्या आत्मप्रेमी, आत्मोन्नत समाजाची नांदी ठरणार आहे.

असे विश्वात्मक गुरुदेव ज्यांच्या जीवनात आले ते धन्य झाले. अध्यात्माला व ध्यानाला अतिशय समजपूर्वक फारच अल्पावधीत कमालीची उंची प्राप्त करुन देणारे प. पू. आत्मा मालिक माऊली गुरुंच्या रुपात जीवनात येणे ही महद्भाग्याची गोष्ट आहे. आजच्या कराल काळामध्ये अनंत समस्या व अनंत प्रश्नांनी माणसाचे विघटन होत असताना त्यांचे सुसघटन ध्यानाच्या रुपाने करुन जगण्याचा राजमार्ग प्रशस्त करणाऱ्या दुर्मिळ सद्‌गुरुंच्या मालिकेतील शुक्रतारा कोकमठाण आश्रमाच्या नभांगणात केवळ आणि केवळ आपल्यासाठीच प्रकाशमान होताना दिसतो. या दिव्य प्रकाशात स्वत:ला सापडण्याची, स्वत:ला शोधण्याची, ओळखण्याची संधी प्रत्येक जीवाला मिळाली आहे. प्रत्येकाच्या जीवनामध्ये ही आत्मपौर्णिमेची पहाट निर्माण करणाऱ्या सद्‌गुरुला कृतज्ञपूर्वक नमन करण्यासाठी आजची व्यासपौर्णिमा, गुरुपौर्णिमा अर्थातच आत्मपौर्णिमा साजरी करुया व प.पू. आत्मा मालिक माऊलींना कोटी-कोटी प्रणाम करुया.

**'ब्रम्हानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति ।**
**व्दंव्दातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम ।।**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं**
**भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि ।।**

**-संत परमानंद महाराज**
संपादक

***




सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## भगवान श्रीकृष्णकथित श्रीसद्गुरूमहिमा

**साधकाचे मन जिथे जिथे जाईल तिथे तिथे परिपूर्णरित्या म्हणजे त्या प्राण्याच्या व वस्तूच्या आत आणि बाहेरही म्हणजे विश्वात सर्वत्र फक्त ब्रह्मच भरून उरलेले आहे, ब्रह्म नाही असे ठिकाणच नाही, म्हणून साधकाचे मन त्यापासून बाजूला जात नसते आणि साधकानेही आपले मन त्यापासून क्षणभरही बाजूला जाऊ द्यावयाचे नसते. अशा प्रकारे श्रीसद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे, शिष्याने ब्रह्माचे अनुसंधान करीत राहिले की त्याचे मन चैतन्यात समरसते म्हणजे चैतन्यरूप होते. त्याचे मन सर्वव्यापी चैतन्याशी एकरूप होणे म्हणजेच 'त्यास पुष्कल ज्ञानाचा उपदेश होणे' होय.**

**-डॉ. विजय बाणकर**

**भ**गवान श्रीकृष्ण यांनी त्यांचे उत्तम उत्तराधिकारी श्रीउद्धव यांच्यापुढे जो श्रीसद्गुरूंचा महिमा गायिला, तो 'श्रीमद्भागवत' या स्वधर्मग्रंथामध्ये ग्रंथित केला गेला आहे. श्रीमद्भागवत म्हणजे 'भगवंताचे हृद्गत' होय. अध्यात्मशास्त्रदृष्ट्या या ग्रंथाचे सार म्हणजे त्याचा अकरावा स्कंध होय, तर 'श्रीएकनाथी भागवत' हे त्याचे मराठी रूप होय.

या ग्रंथाच्या एकोणतिसाव्या अध्यायातील सव्वीसाव्या श्लोकाचा भावार्थ म्हणून संत श्रीएकनाथ यांनी ज्या ओव्या लिहिल्या आहेत, त्यांमध्ये श्रीसद्गुरूंचा अनन्यसाधारण महिमा व्यक्त झाला आहे. श्रीगुरूपौणिमा या परम पावनकर शुभलाभदिनी श्रीसद्गुरूंचा तो महिमा जाणून घेण्याचा प्रयत्न करूयात.

भागवताच्या उपरोक्त अध्यायातील बावीस ते पंचवीस या क्रमांकाच्या श्लोकांचा भावार्थ सांगताना संत श्रीएकनाथ यांनी, ब्रह्मज्ञान कुणाला प्राप्त होत असते, ते स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, 'भगवान श्रीकृष्ण म्हणतात, की विश्वातील सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी जे मलाच पाहतात, सर्वकाही मीच आहे या भावाने जे माझे अखंड भजन करीत असतात, त्यांच्या बुद्धीचीही बुद्धी म्हणजे महाबुद्धी होय व ती मीच होय. अर्थात, कर्म ब्रह्मार्पण करणारी बुद्धी हीच खरी महाबुद्धी असून, तिच्यायोगेंच जीव परिपूर्ण ब्रह्म होत असतात.'

त्यानंतर, खरे शहाणपण ते कोणते व ब्रह्मप्राप्ती कधी होते, त्याबाबत ते म्हणतात, 'ज्याच्यायोगें जीव सनातन ब्रह्म होतात ते शहाणपण म्हणजे, देह मिथ्या आहे असे नीट जाणून घेऊन देवाचे अविरत भजन करणे, हा सद्भाव होय. मुळात मायाच मिथ्या आहे आणि देह ही त्या मायेची केवळ कल्पना आहे. म्हणून, कोंडा टाकून देऊन ज्याप्रमाणे आपण धान्यकणराशी घेतो त्याप्रमाणे मिथ्या देहाची सर्व कर्मे देवाला अर्पण करून आपण सत्य ब्रह्म होणे, हे खरे शहाणपण होय. अनित्य म्हणजे विनाशी असलेल्या देहाच्या ठिकाणी असलेली आसक्ती पूर्णतः सोडून दिली की नित्य म्हणजे सदासर्वदा अविनाशी असलेल्या ब्रह्मरूपी वस्तूची प्राप्ती होते, ही जी बुद्धिमंतांच्या ठिकाणी मोठी (दृढ) बुद्धी (सन्मती) असते ती खरी आत्मसंतुष्टी होय.

विविध मतमतांतरे सोडून देऊन शुद्ध ब्रह्मज्ञानप्राप्तीबाबत तुला मी जो हा मज परमात्म्याच्या 'जिव्हारीं' असलेला ठाम निर्धार (निर्णय) सांगितला तोच 'आत्मज्ञानाचे निजसार', 'परमार्थाचे गुह्य भांडार' व 'सुखाचे सार' आहे, हे तू समजून घे.'

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हे ज्ञान कुणाला सांगावे तेही भगवान श्रीकृष्ण यांनी त्यांचे उत्तम उत्तराधिकारी श्रीउद्धव यांच्याजवळ आणि पर्यायाने त्यानंतर गुरूपरंपरेनुसार हे ब्रह्मज्ञानदानरूपी महान कार्य जे करणार आहेत त्या सर्व महात्म्यांसाठीही स्पष्ट करून ठेवले आहे. ते म्हणतात-

'निष्काम भावनेने म्हणजे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक, राजकीय, स्वर्गीय सुखाची आणि मुक्तीचीही म्हणजे कोणत्याही प्रकारची यत्किंचितही अपेक्षा न ठेवता काया, वाचा, चित्त, गृह, दारा, वित्त व जीवित हे सर्व म्हणजे आपले सर्वस्वच जे लोक केवळ मलाच अर्पण करतात, तेच माझे अनन्य भक्त असतात. 'अशा भक्तांच्या ठिकाणी जे ज्ञान अवश्य उपदेशावे'१ म्हणजे संक्रमित करावे त्या ज्ञानाचे पक्व परिपूर्ण लक्षण असे आहे :

साधकाचे मन जिथे जिथे जाईल तिथे तिथे परिपूर्णरित्या म्हणजे त्या प्राण्याच्या व वस्तूच्या आत आणि बाहेरही म्हणजे विश्वात सर्वत्र फक्त ब्रह्मच भरून उरलेले आहे, ब्रह्म नाही असे ठिकाणच नाही, म्हणून साधकाचे मन त्यापासून बाजूला जात नसते आणि साधकानेही आपले मन त्यापासून क्षणभरही बाजूला जाऊ द्यावयाचे नसते. अशा प्रकारे श्रीसद्गुरूंनी सांगितल्याप्रमाणे, शिष्याने ब्रह्माचे अनुसंधान करीत राहिले की त्याचे मन चैतन्यात समरसते म्हणजे चैतन्यरूप होते. त्याचे मन सर्वव्यापी चैतन्याशी एकरूप होणे म्हणजेच 'त्यास पुष्कल ज्ञानाचा उपदेश होणे' होय.

अशाप्रकारे, माझ्या भक्ताला जो समूळ ब्रह्मज्ञानाचे दान करतो, त्याचा (सद्गुरूचा) मी परमात्मा संपूर्णतः 'ब्रह्मऋणी' असतो. त्याला अतिशय मूल्यवान अशी एखादी गोष्ट देऊन त्याच्या ऋणातून उत्तीर्ण होता येईल असे माझ्याजवळ काहीही नसते. म्हणून, मी त्याला निजरूपच म्हणजे माझे स्वरूपच अर्पण करतो. मी अहोरात्र त्याच्याजवळ असतो. जो आपल्या शिष्याला हे 'पुष्कल' ज्ञान म्हणजे ब्रह्म सर्वत्र आहे या अनुभवयुक्त ज्ञानाचे दान करतो त्याच्या मी परमात्मा सदासर्वदा अधीन असतो. ब्रह्मदाता असलेल्या त्या महात्म्याच्या बोलाप्रमाणे म्हणजे त्याने सांगितलेल्या सर्व वर्ण, जाती व धर्मांतील आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचा मी उद्धार करतो.

माझ्या भक्ताला परब्रह्म देऊन जो निष्कर्म करतो त्याचा (त्या सद्गुरूचा) मी सदैव अंकित असतो. तो मला परमप्रिय असतो. माझ्या भक्तांना ब्रह्मज्ञान देतो, त्याच्याहून श्रेष्ठ असा अन्य कुणीही नसतो व त्याच्याहून अन्य कुणीही मला अधिक आवडता नसतो. हे उद्धवा! तू हे जाणून घे की, तो आत्मा असून मी त्याचे शरीर होय; किंबहुना, मी त्याचा देहच झालेलो असतो (त्याचा देह मद्रूपच झालेला असतो).'

यानंतरच्या ओवीत भगवान श्रीकृष्ण यांनी ब्रह्मदात्या सद्गुरूंचा ज्या शब्दांत महिमा सांगितला आहे, ते विशेष शब्द असलेली ती श्रीएकनाथकृत ओवी अशी आहे,

**'जैसा मी अवतारधारी। तैसाचि तोही अवतारी।**
**त्या आणि मजमाझारीं। नाहीं तिळभरीं अंतर।।'**

भगवान श्रीकृष्ण म्हणतात, (निर्गुण निराकार असलेला) मी जसा अवतार धारण करून म्हणजे सगुण साकार रूप धारण करून येत असतो तसाच तोही अवतारी असतो.२ खरे तर, त्याच्यात व माझ्यात तिळमात्रही अंतर वा वेगळेपण नसते.३ यापूर्वी उल्लेखिलेल्या 'पुष्कल ब्रह्मज्ञानाचे दान' करतो त्याला मी माझी सर्व अवतारशक्ती प्रदान केली तरी म्हणजे त्याला जरी मी माझे सर्वस्व अर्पण केले तरी त्याने माझ्या भक्तांना जे ब्रह्मदान केलेले असते, त्या त्याच्याकडून माझ्यावर झालेल्या सर्वश्रेष्ठ उपकारांतून मी कधीही उतराई होत नसतो. म्हणूनच त्या देहधारी महात्म्यावरील प्रेमापोटी त्याला माझे सारसर्वस्व अर्पण करण्याच्या हेतूने मीही वेळोवेळी शरीर धारण करतो आणि त्याच्या घरी त्याची अखंड सेवा करीत राहतो. त्याला जे जे काही जड, अवजड वाटेल, वाटते तेही मी माझ्या डोक्यावर घेऊन वाहत राहतो, त्याला काहीही जड, अवजड वाटू नये म्हणून त्याचे घरीं मी 'माझी चैतन्यसाम्राज्यरूपी लक्ष्मी अखंड नांदत

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

(आनंदाने राबत) ठेवतो.४ अशा प्रकारे मी त्याची अविरत काळजी वाहत असतो.'५

थोडक्यात, श्रीमद्‌भागवत या ग्रंथात जे ब्रह्मज्ञान आहे, त्याचा यथार्थ बोध आपल्या शिष्याला करून देऊन त्याला ब्रह्मज्ञानाचे दान देतात त्या परब्रह्मस्वरूप श्रीसद्‌गुरूंना मी स्वतः होऊन आपला आत्माच अर्पण करीत असतो, अशा शब्दांत भगवान श्रीकृष्ण यांच्या मनात श्रीसद्‌गुरूंबद्दल असणारा भाव संत श्रीएकनाथ यांनी विशद केला आहे.

* * * * *

**टिपा व संदर्भ :**

१. अ) संत श्रीएकनाथ महाराज यांनी 'ऐशिया भक्तांच्या ठायीं जाण। अवश्य उपदेशावे हे ज्ञान।', असे ओवी क्र.४३७ मध्ये म्हटले आहे. 'भक्तांच्या ठायीं उपदेशावे' या शब्दांतून त्यांनी ब्रह्मज्ञानी सद्‌गुरू जे कार्य करतात त्या कार्याचे विशेषत्व सूचित केले आहे. 'भक्ताला हे ज्ञान उपदेशावे' असे न म्हणता 'भक्ताच्या ठायीं हे ज्ञान उपदेशावे', हे शब्द त्यांनी उपयोजिले आहेत. त्यांच्या या शब्दांचा अर्थ करताना, सद्‌गुरू करतात त्या कार्याचे जे विशेष स्वरूप स्वामी विवेकानंद यांनी स्पष्ट केले आहे, ते लक्षात घेतले आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'ज्या व्यक्तीच्या आत्म्यापासून इतरांच्या आत्म्यात शक्ती संचारित (ट्रान्समिट) होत असते त्या व्यक्तीला गुरू वा आचार्य म्हणतात आणि ज्या व्यक्तीच्या आत्म्यात ती संचारित होते तिला शिष्य वा साधक म्हणतात. अशा तऱ्हेचा शक्तिसंचार व्हावयाचा असल्यास प्रथमतः म्हणजे तसला संचार करणार त्याचे ठायी संचार करण्याची क्षमता असावयास हवी आणि द्वितीयतः म्हणजे ज्याच्यात शक्ती संचारित होणार त्याच्या ठिकाणी ती ग्रहण करण्याची पात्रता असावयास हवी.' - भक्तियोग, पृष्ठ क्र. २६, प्रकाशक : रामकृष्ण मठ, धंतोली, नागपूर-४४०११२, (२१वे पुनर्मुद्रण २०१४); ब) परमेश्वराची प्राप्ती होते म्हणजे नेमके काय होते ते समजावून 'देण्यासाठी' गुरूशिष्यपरंपरा सुरू व रूढ झाली आहे, असे स्वतः देवानेच म्हणजे भगवान श्रीकृष्ण यांनीच श्रीज्ञानदेवांच्या मुखातून सांगितले आहे. ते म्हणतात, 'एक शिष्य एक गुरू। हा रूढला साच व्यवहारू। तो मत्प्राप्तिप्रकारू। जाणावया।।' - ज्ञानेश्वरी, १८.१२२६) आणि स्वामी विवेकानंद म्हणतात, 'नथिंग, आय से, कॅन बी डन विदाऊट दि चेन ऑफ डिसायपलशीप, दॅट इज, दि पॉवर दॅट इज ट्रान्समिटेड फ्रॉम दि गुरू टू दि डिसाटपल, अँड फ्रॉम हिम टू हिज डिसायपल, अँड सो ऑन.' - पेज नं. ५३, पर्ल्स ऱ्आफ विजडम, दि रामकृष्ण मिशन इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर, गोल पार्क, कोलकता-७०००२९, (सेवन्टिंथ इंप्रेशन, २०१८);

२. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'दि गुरू इज दि ब्राईट मास्क विच गॉड वेअर्स इन ऑर्डर टू कम टू अस.' - पेज नं. ५१, पर्ल्स ऑफ विजडम;

३. हे भगवंताचे म्हणणे वाचून 'गुरू साक्षात्‌ परब्रह्म', हे संस्कृत विधान आठवते.

४. ओव्या क्र. ४३६ ते ४५०;

५. स्वतः संत श्रीएकनाथ यांच्या घरी देव श्रीखंड्या नावाचा गडी म्हणून २५ वर्षे पाणी भरीत होता तसेच संत श्रीजनाबाई यांनी 'जनी जाय पाणीयासी। मागे दावे ऋषीकेशी।।१।।' या अभंगात म्हटल्याप्रमाणे देव त्यांच्या पाण्याने भरलेल्या घागरी वहात असे, त्यांचे धुणे धुवून आणीत असे आणि सडासारवणही करत असे. इतर अनेक संतांच्या घरीही देव विविध रूपे धारण करून त्यांची कामे पूर्ण करून जात होता, असे उल्लेख संतसाहित्यात आहेत.

**-डॉ. विजय बाणकर,**
मु. पो. खडकवासला (आर.एस.), पुणे-४११०२४
(९३२५५८८०९५)

✻✻✻

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



## संत तुकाराम महाराजांची सद्गुरुनिष्ठा

**माघ शुद्ध दशमीस तुकोबांना स्वप्नात श्रीगुरुचा अनुग्रह झाला. तो गुरुमंत्र मिळताच त्यांना अद्वैताचा साक्षात्कार झाला. सद्गुरु प्राप्तीनंतर साधकाच्या जीवनात आमूलाग्र बदल होतो. गुरुंची सेवा घडली नाही, असे तुकोबा म्हणतात. स्वप्नदृष्टांत होण्यापूर्वी संत तुकारामांनी प्रचंड संसारिक तपाचरण केले. आई, वडील, पत्नी आदि नातेवाईकांचे मृत्यू झाले. ते दुःख त्यांनी सहन केले. दुष्काळ, गरिबी, व्यवहारात दिवाळे निघाले. लोकनिंदा, मानहानी ही संकटे सहन केली. डोंगरावर हिंडत देवाचा शोध घेण्याचे कष्ट केले. ह्या अशा कठोर तपश्चर्येनंतरच तुकोबांना स्वप्नदृष्टांत घडला. सत्शिष्यांचा शोध घेत घेत सद्गुरू येतो.**

**-नामदेव सदावर्ते**

**सं**त तुकाराम महाराजांना वैराग्यमूर्ती म्हणून ओळखवतात. ज्ञानेश्वर महाराजांना ज्ञानमूर्ती, नामदेव महाराजांना प्रेममूर्ती, एकनाथ महाराजांना शांतिमूर्ती व रामदास स्वामींना सामर्थ्यमूर्ती म्हणून सारा वारकरी संप्रदाय मानतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी सन्मानाने, आदरपूर्वक पाठविलेला बहुमूल्य नजराणा तुकोबांनी नाकारला. छत्रपतींना गुरुपदेश सांगून त्यांना स्वराज्यनिर्मितीस प्रवृत्त केले. शिवरायांना तुकोबांनी आशीर्वाद दिला. संत तुकाराम महाराजांना 'जगद्गुरू' ही पदवी देऊनही गौरविण्यात आले आहे. तुकोबांनी आपल्या अभंगवाणीद्वारे साऱ्या जगाला उपदेश केला आहे. तत्कालिन विविध उपासना पद्धतीतील अंधश्रद्धा मोडून नामस्मरण भक्तीचा प्रसार केला. तुकोबांच्या घराण्यात परंपरागत विठ्ठलभक्ती होती. प्रपंचात राहूनही परमार्थ साधना करता येते, हा विचार त्यांनी सांगितला. पूर्वीचे सर्व संतमंडळ संसारिक, गृहस्थधर्मी होते. ईश्वरप्राप्तीसाठी घरसंसार त्यागाची गरज नाही, हे त्यांनी समाजाला पटवून दिले. तुकाराम महाराजांच्या जन्मापासून वैकुंठ गमनापर्यंतचे चरित्र महाराष्ट्राला परिचित आहे. आपल्या जीवनातील प्रापंचिक संकटांना न घाबरता ईश्वरावर एकनिष्ठ भक्ती करीत जगणारे तुकोबा गोरगरीब, सामान्य, अज्ञानी जनतेला आपल्या जवळचे वाटत. देवा-धर्माच्या नावावर सामान्यांना काही धर्ममार्तंड वेठीस धरून त्यांना लुबाडीत असत. त्या निरक्षर जनतेला तुकोबांचा आधार मिळाला. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथांप्रमाणे विठ्ठलभक्ती परंपराच पुढे चालवीत नेणारे संत तुकोबा संतांना आपले गुरू, मार्गदर्शक मानीत असत. जगद्गुरू असलेल्या तुकोबांनी ज्ञानदेव-नामदेवांनी सांगितलेले ज्ञान आपल्या अभंग रचनेतून सांगितले. ते म्हणतात-

**फोडिले भांडार धन्याचा हा माल।**
**मी तव हमाल भारवाही।।**

अर्थात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत, अमृतानुभवात जे ज्ञान सांगितले, तेच मी सांगतो. अत्यंत सोप्या भाषेत सामान्य लोकांशी ते मराठी भाषेतील अभंगांतून संवाद साधीत होते. संस्कृत भाषेत अडकून पडलेले धर्मविषयक, उपासनाविषय, अध्यात्मज्ञान मराठी भाषेतून अभंगाद्वारे ते लोकांना सांगत होते.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

त्यामुळे जनलोकांचे समाधान होत होते. नामस्मरणाच्या सोप्या मार्गाने आपण परमार्थ साधू शकतो, असे सामान्यांना वाटे. त्यामुळे त्यांना दिलासा मिळे. तुकोबांचे अभंग ते गावू लागले. त्यांचे कीर्तन ऐकून लोक नामस्मरण करू लागले.

संत तुकाराम नामदेवांनाही गुरू मानीत होते. अभंग करून नामभक्तीचा प्रसार करण्याचे काम त्यांनीच मला सांगितले आहे, असे ते एका अभंगात सांगतात. संत नामदेव महाराज श्रीपांडुरंगांना बरोबर घेऊन माझ्या स्वप्नात आले आणि म्हणाले, कवित्व कर. अभंगरचना करून कीर्तन परंपरा पुढे चालव!'

**नामदेवे केले स्वप्नामाजी जागे।**

**सवें पांडुरंगे येवोनिया ।।१।।**

**सांगितले काम करावे कवित्व।**

**वाऊगे निमित्य बोलो नये।।२।।**

**माप टाकीसळे धरीली विट्ठले।**

**थापटोनि केले सावधान।।३।।**

**प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी।**

**उरले ते शेवटी लावी तुका ।।४।।**

नामदेव महाराज व पांडुरंगाच्या प्रेरणेने तुकोबांनी कवित्वाची स्फूर्ती घेऊन अभंगरचना केली. ज्ञानाच्या बळावर कविता करणारे पुष्कळ असतात. पण भगवंताच्या व गुरुदेवांच्या प्रेरणेने जे काव्य निर्माण होते ते अक्षर साहित्य ठरते. त्याच रचनेला प्रासादिक रंग येतो. स्वप्नात गुरुचा उपदेश झाल्यानंतरच मला अभंगरचनेची स्फूर्ती झाली, असे तुकोबा आत्मचरित्रपर अभंगात सांगतात.

**सत्य असत्यासी मन केले ग्वाही।**

**मानियेले नाही बहुमता ।।१।।**

**मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश।**

**धरिला विश्वास दृढ नामी।।२१।।**

**यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ति।**

**पाय धरिले चित्ती विठोबाचे ।।३।।**

अशा प्रकारे संत तुकोबांना स्वप्नात गुरुकृपा झाली. त्यानंतर तुकोबांना जीवनाचे कार्य समजले. संसारातील संकटांवर मात करण्याची शक्ती सद्‌गुरुकृपेनेच प्राप्त होते. सद्‌गुरुकृपा होताच मानवाचा अहंकार नष्ट होऊन नवीन जन्म होतो. जगण्याला अर्थ प्राप्त होतो. संत तुकोबांना स्वप्नात जसे सहा संतांनी दर्शन दिले तसेच त्यांना स्वप्नात सद्‌गुरुही प्राप्त झाले, असा उल्लेख असलेला एक अभंग प्रसिद्ध आहे.

**सत्य गुरुराये कृपा मज केली।**

**परि नाही घडली सेवा काहीं।।१।।**

**सांपडविले वाटे जातां गंगास्नाना।**

**मस्तकी तो जाणा ठेविला कर ।।२।।**

**भोजना मागती तूप पावशेर ।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**पडिला विसर स्वप्नामाजी।।३।।**

**काय कळे उपजला अंतराय।**

**म्हणोनिया काय त्वरा झाली।।४।।राघव चैतन्य केशव चैतन्य।**

**सांगितली खूण मालिकेची।।५।।**

**बाबाजी आपुले सांगितले नाम।**

**मंत्र दिला रामकृष्ण हरी।।६।।**

**माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार।**

**केला अंगिकार तुका म्हणे।।७।।**



'रामकृष्ण हरि' हा मंत्र तुकोबांना सद्‌गुरूंनी स्वप्नात दिला. हाच मंत्र त्यांनी साऱ्या जगाला दिला. वारकरी संप्रदायाचा वा भागवतधर्माचा हाच महामंत्र आहे. उघडा मंत्र जाणा, रामकृष्ण हरि म्हणा. हा मंत्र देऊन तुकोबा जगद्‌गुरू झाले.

चैतन्य संप्रदायी सद्‌गुरू बाबाजी चैतन्य यांनी तुकोबांना स्वप्नात येऊन गुरुदीक्षा दिली. चैतन्य संप्रदायाची गुरुमालिका पुढीलप्रमाणे सांगतात. या गुरुपरंपरेचे आदिगुरु श्रीमहाविष्णू हे असून, त्यांचे शिष्य ब्रह्मदेव, नारद, व्यासमहर्षी, राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजी चैतन्य व आठवे संत तुकाराम.

तुकोबा वयाच्या चोवीसाव्या वर्षी भंडारा डोंगरावर झोपलेले असताना हा स्वप्नदृष्टांत झाला. शके १५५४, माघ शुद्ध दशमीस गुरुवारी पहाटे हा स्वप्नदृष्टांत झाला. चैतन्यकया कल्पतरू नावाच्या एका ओवीबद्ध ग्रंथात या संप्रदायातील सद्‌गुरूंच्या समाधी स्थळांबाबत माहिती सांगितलेली आहे. श्रीविष्णूंनी ब्रह्मदेवास व नारदांनी व्यासमहर्षीना उपदेश केला. नंतर व्यासांनी राघवचैतन्यास आत्मज्ञानाचा उपदेश केला. त्यांनी नंतर केशव- चैतन्यास व त्यांनीच तुकोबांना गुरुपदेश दिला. राघवचैतन्यांनी खूप कठोर तपश्चर्या केली, असे वर्णन आढळते.

**जाल्या नखांच्या चुंबळी।**

**अंगावरी वाढली धुळी।**

**जटा लोंबती भूतळी।**

**देह शुष्क जाहला।।**

अशी कठोर तपश्चर्या पाहून श्रीव्यास प्रगट झाले व त्यांनी राघव चैतन्य यांना 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा प्रणवयुक्त मंत्र देऊन आत्मज्ञान दिले. पुणे जिल्ह्यातील जुन्नरपासून चार कोसावर ओतूर हे गाव आहे. तेथून चार मैलावर पुष्पावती उर्फ कुसुमावती ही नदी कुकडी नदीस मिळते. त्या ठिकाणी हा गुरुपदेश दिला असे म्हणतात. राघव चैतन्य हे थोर सिद्धपुरुष होते, तसेच ते प्रेमळ कृष्णभक्त होते.

माघ शुद्ध दशमीस तुकोबांना स्वप्नात श्रीगुरुचा अनुग्रह झाला. तो गुरुमंत्र मिळताच त्यांना अद्वैताचा साक्षात्कार झाला. सद्‌गुरुप्राप्तीनंतर साधकाच्या जीवनात आमूलाग्र बदल होतो. गुरुंची सेवा

घडली नाही, असे तुकोबा म्हणतात. स्वप्नदृष्टांत होण्यापूर्वी संत तुकारामांनी प्रचंड संसारिक तपाचरण केले. आई, वडील, पत्नी आदि नातेवाईकांचे मृत्यू झाले. ते दुःख त्यांनी सहन केले. दुष्काळ, गरिबी, व्यवहारात दिवाळे निघाले. लोकनिंदा, मानहानी ही संकटे सहन केली. डोंगरावर हिंडत देवाचा शोध घेण्याचे कष्ट केले. ह्या अशा कठोर तपश्चर्येनंतरच तुकोबांना स्वप्नदृष्टांत घडला. सत्शिष्यांचा शोध घेत घेत सद्‌गुरू येतो. सद्‌गुरुचा शोध घेण्याची गरज नसते.

सद्‌गुरूंची स्वप्नात भेट घडल्यानंतर तुकोबा म्हणतात- खरेच सांगतो मला स्वप्नात गुरुकृपा झाली. सद्‌गुरू वा देव भेटावा म्हणून मी अहोरात्र तळमळत होतो. मी ध्यास घेतला होता. माझ्याकडून त्यांची सेवा घडली नाही तरी त्यांनी मला आत्मज्ञान दिले. माझ्या मस्तकावर त्यांनी हात ठेवताच ही स्पर्शदीक्षा घडली. त्यातून ज्ञान संक्रमित झाले. त्या साक्षात्कारामुळे माझा जीव शिवदशेला प्राप्त झाला. मला सद्‌गुरूंनी थापटून जागे केले.

तुकोबा म्हणतात- श्रीगुरूंनी मस्तकावर हात ठेवल्यावर त्यांनी भोजनासाठी पावशेर तूप मागितले. परंतु, मला स्वप्नातच विसर पडला, अनुग्रह दिला तो स्वप्नात, तूप मागितले ते स्वप्नात व विसर पडला तोसुद्धा स्वप्नातच. तूप याचा अर्थ अंतःकरण असा आहे. तूप जसे स्निग्ध व स्नेहपूर्ण, असते म्हणून तुपास अंतःकरणाची उपमा देतात. तसेच मन, बुद्धी, चित्त व अहंकार असे चार भाग अंतःकरणाचे असतात. या चारपैकी पाव भाग, जे चित्त ते श्रीगुरूंनी मागितले. चित्त मागण्याचा हेतू असा की परमार्थ चित्ताने करावा लागतो.

चित्त स्वाधीन झाले तरच आत्मध्यानी साधक तल्लीन होऊ शकतो. शरीरात पित्त, संसारात वित्त व परमार्थात चित्त आवश्यक असते. काही गुरू एकांतात नेऊन शिष्यांना मंत्र देतात. कानात फुंकता फुंकता ते काही तरी सांगतात व मी दिलेला मंत्र कुणालाही सांगू नको असे म्हणतात, असा चोरीचा मामला परमार्थात नसावा असे तुकोबा एका अभंगात म्हणतात-

**नेणे फुंको कान। नाही एकांतीचे ज्ञान।।१।।**
**तुम्ही आइका हो संत। माझा सादर वृतांत।।२।।**
**नाही देखिला तो डोळां। देव दाखवू सकळा।।३।।**
**चिंतनाच्या सुखे। तुका म्हणे नेणे दुःखे।।४।।**

मंत्रामध्ये मोठे सामर्थ्य असते. ज्याचे मनन केले असता तो जीवाचे रक्षण करतो, म्हणून त्यास मंत्र म्हणतात. **मननात् त्रायते यस्मात्, तस्मात् मंत्रः प्रकीर्तितः ।**

शिष्यांकडून काहीही न घेता, एकांतात कान न फुंकता तुकोबांनी सर्व जगाला मंत्र दिला, 'रामकृष्ण हरी' हा उघडा मंत्र दिला म्हणून त्यांना आपण जगद्‌गुरू म्हणतो.

तुकोबांनी संसारी जीवनात प्रचंड संकटे सोसली. धार्मिक क्षेत्रातील प्रतिष्ठितांकडून त्यांची मानहानी झाली. दुष्काळ पडला, दिवाळे निघाले. त्यामुळे त्यांच्या मनात वैराग्य निर्माण झाले. त्यातूनच त्यांना ईश्वरप्राप्तीची ओढ निर्माण झाली. त्यानंतर त्यांच्यावर सद्‌गुरू व संतांची कृपा झाली. ते आत्मसाक्षात्कारी बनले. ते म्हणतात- सद्‌गुरू कृपेमुळे मला देवांनी बोलावयास शिकविले. मला आलेला अनुभव मी अभंगातून सांगतो. ते अभंग तुमचेही कल्याण करतील. गुरुमार्गाबद्दल संत तुकोबा परखड मत व्यक्त करतात.

**गुरुमार्गामुळे भ्रष्ट झाले सकळ।**
**म्हणती यातीकूळ नाही ब्रह्मी।।१।।**
**पवित्राला म्हणती नको हा कंटक।**
**मानिती आत्मिक अनामिका।।२।।**
**डोहोर लोहार दासी बलुती बारा।**
**उपदेशी फारा रांडापारे ।।३।।**
**काही टाण्याटोण्या विप्रशिष्या होती ।**
**उघडी फजिती स्वधर्माची ।।४।।**
**नसता करूनि होम खाती एके ठायी।**
**म्हणती पाप नाही मोक्ष येणे ।।५।।**
**नाही शास्त्राधार पात्रापात्र नेगे।**
**उपदेशून घेणे द्रव्य काही ।।६।।**
**तुका म्हणे ऐसे गुरुशिष्य जाण।**
**विठोबाची आण नरका जाती।।७।।**

जगद्‌गुरू संत तुकाराम सद्‌गुरूंइतकेच संतांनाही महत्त्व देतात. ज्ञानोबा माऊलींचे ते भक्त होते. नामदेवांना तर ते गुरू मानीत होते. ते म्हणतात- संतांनी माझ्यावर खूप उपकार केले आहेत. त्यांच्या ऋणातून उतराई होणे अशक्य आहे. त्यांचे चरणी जीव अर्पण केला तरी त्यांचे उपकार फिटणार नाहीत. त्यांचे सहजपणे बोलणे आपल्यासारख्या सामान्य लोकांना हिताचा उपदेशच आहे. गायीच्या ध्यानीमनी जसे सतत वासरू असते, तसेच ते माझी सतत काळजी घेतात. तेच मला सांभाळतात. तुकोबा म्हणतात-

**तुम्ही संत मायबाप कृपावंत।**
**काय मी पतित कीर्ती वाणू ।।१।।**
**अवतार तुम्हा घ्यावया कारण।**
**उद्धरावे जन जड जीव ।।२।।**
**वाढविले सुख भक्ति भाव धर्म ।**
**कुळाचार नाम विठोबाचे ।।३।।**
**तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी।**
**तैसे तुम्ही जगी संत जन ।।४।।**

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांची सद्‌गुरूनिष्ठा व संतप्रेम अलौकिक होते. संत तुकोबांना विनम्र वंदन !

**-नामदेव सदावर्ते**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## अंतरंग मार्गदर्शक सद्‌गुरू

ईश्वरप्राप्ती हा विषय नसल्याने त्याला मोबदला देऊन प्राप्त करता येत नाही. ईश्वर प्राप्तीसाठी षड्रिपूंवर विजय प्राप्त करून निष्काम व निरपेक्ष भाव धारण करून साधनेत रत होणे आवश्यक आहे. दृश्य संसारात रममाण झालेल्या व्यक्तीला अव्यक्त संसारविरहीत दुनियेत रत होणे महाकठीण आहे. नामसंकीर्तनाने ईश्वरप्राप्ती होत असली तरी नामसंकीर्तन हे ईश्वरप्राप्तीची तळमळ निर्माण करताना माणसाला वासना विरहित करून वैराग्य मार्गावर घेऊन जाते. त्यावेळी सर्व षड्रिपू गळून पडतात व ईश्वर प्राप्तीशिवाय अन्य कोणतीही विषय कामना व भाव शिल्लक राहात नाही. ईश्वर विषय नसल्याने ती कामना व भाव हे अनुक्रमे निष्काम व निरपेक्ष होतात.

**- बंडोपंत कुलकर्णी**

आपण जे काही करतो, जसे वागतो, जे इच्छितो ते सर्व आपणास त्यांच्याकडून अपेक्षित असते. ते सर्व जाणून आहे, अगर ते आपल्याप्रमाणेच सर्व करू इच्छितात. आपणास किराणा माल हवा असल्यास आपण कपड्यांच्या दुकानात जात नाहीत, तर किराणा दुकानातच जातो. संताजी महाराज यांनी याच आशयाने आपले मनोरथ माझिया जातीचा मज भेटो कोणी। या अभंगातून व्यक्त केले आहे. जरी तो त्यांचा मनोभाव असला तरी त्यांचे समकालीन आणि भविष्यात आध्यात्मिक साधनेत प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या साधकांसाठी मार्गदर्शन आहे. इतकेच नव्हे तर साधकाच्या अंगी निर्धार, संकल्प आणि साधना यावर मनोधैर्य रूढ करते.

संताजी महाराज ईश्वर कृपाभिलाषी होते. त्यांना ईश्वर भेटीची तळमळ होती. ईश्वर भेटीची तळमळ झेललेला व ईश्वर भेट घेतली अशी व्यक्ती भेटल्याशिवाय ईश्वरप्राप्ती नाही. अशी व्यक्ती कोण, तर सद्‌गुरू हे एकमेव होय. कारण शिष्याचे कल्याण हे सद्‌गुरूशिवाय अन्य कोणी करू शकत नाही. म्हणून संताजी महाराजांना सद्‌गुरूप्राप्ती, कारणपरत्वे, ईश्वर प्राप्त करून देण्यासाठी गुरूप्राप्तीची तळमळ होती. त्यांनी त्यांच्या या अवस्थेत असताना हा अभंग लिहिला असावा. म्हणून म्हणतात-

**माझिया जातीचा मज भेटो कोणी।**
**आवडिची धनी पुरवावया ॥**

या ठिकाणी अभंगात वापरण्यात आलेली जात ही आज प्रचलित असलेली जात अपेक्षित नाही. ते संतांना अभिप्रेत नाही. आज समाजात जातीचे स्तोम फार माजले आहे. प्रत्येक मनुष्य स्वस्थानी श्रेष्ठ असतो. त्यामुळे दुसरा कसा वागतो व काय करतो, हे पाहण्याची गरज नाही. इतर कसे वागतात, काय करतात, याचे निरीक्षण करीत राहणे वा त्यांना दोष देत राहणे, म्हणजे स्वतःच्या आचरणावर शंका घेणे वा स्वतःच्या आचरणात स्वतः दोष पाहणे होय. स्वतःतील दोष पाहणे, हे उत्तम आहे. पण तसे दोष पाहिल्यावर ते दोष दूर करण्याचा प्रयत्न होत असल्यास ते उत्तम ठरते. दोष ते दोष नसून आपण जे करतो ते उत्तम म्हणत राहिल्यास चुकीचे ठरते. कारण इतरांच्या नैतिक आचरणात पाहिल्यास दृष्टी दोषी होते व आपली नैतिकता ढळून शुद्धतेच्या नावाखाली अशुद्ध आचरण चालू राहते, यात स्वघात होतो. यापेक्षा इतरांकडे दुर्लक्ष करून स्वतःकडे पाहत राहिल्यास दोष लागणार नाही व कालांतराने नकळत असलेले किरकोळ दोष दूर होत जाऊन आचरण शुद्ध होईल. म्हणजे त्यावेळी जन्माला चिकटलेली तथाकथित जात मग सनातन जातीत म्हणजे ईश्वर प्राप्तीसाठीच जन्माला घातलेली जात हीच मनुष्य जात आहे, हे लक्षात येईल व ईश्वरप्राप्तीची

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

तळमळ येईल, हेच संत आपल्या अभंगातून सांगत आहेत.

ज्याचं जळतं त्यालाच कळतं अशी म्हण आहे. तशी ही म्हण एखाद्या वाईट प्रसंगाने असह्य त्रास होताना त्याला ते निर्दयी सहन करण्यास सांगतात, तेव्हा वापरली जाते. पण त्या म्हणीतील शब्द न पाहता त्यातील आशय पहावा. ज्याला एखाद्या गोष्टीचा अनुभव असेल, तेव्हा पुन्हा तसा प्रसंग घडला असता त्यास त्यातील मर्म कळेल, हा आशय आहे. म्हणजे येथे अनुभवाला महत्त्व दिले आहे. येथे संतू महाराजांना तेच दर्शवायचे आहे.

**माझिया जातीचा मजशी मिळेल ।**
**कळेल तो सर्व समाचार।।**

म्हणजे ज्याने ईश्वरप्राप्तीची तळमळ सहन केली व त्या तळमळीतून त्याला तो प्राप्त झाला, अशा व्यक्ती वा सिद्ध पुरूषांच्या शोधात महाराज होते. त्यांना सिद्ध पुरूष भेटीचीच तळमळ होती, हे निश्चित. कारण त्यांना त्या सिद्ध पुरूषांकडून समाचार हवा होता. ज्याला माहिती व अनुभव आहे, तोच समाचार देऊ शकतो. समाचार म्हणजे ईश्वर प्राप्तीचा सखोल मार्ग व त्याचे रूप, गुण विशेषण वगैरे. कारण ईश्वर भेटला तर त्याला ओळखणार कसा? म्हणून सिद्ध पुरूष म्हणजेच सद्‌गुरूचा शोध महाराजांना होता. म्हणून म्हणतात -

**माझिया जातीचा मजशी मिळेल। कळेल तो सर्व समाचार।।**
**संतू म्हणे येथे पाहिजे जातीचे। येर गबाळाचे काम नाही।।**

येथे पाहिजे जातीचे म्हणजे अन्य काही नसून ते ज्या गोष्टीसाठी धडपडत वा प्रयत्नात होते, तशीच धडपड व प्रयत्न करून तीच गोष्ट ज्याने प्राप्त केली तो होय. ईश्वरप्राप्ती हा विषय नसल्याने त्याला मोबदला देऊन प्राप्त करता येत नाही. ईश्वर प्राप्तीसाठी षड्‌रिपूंवर विजय प्राप्त करून निष्काम व निरपेक्ष भाव धारण करून साधनेत रत होणे आवश्यक आहे. दृश्य संसारात रममाण झालेल्या व्यक्तीला अव्यक्त संसारविरहीत दुनियेत रत होणे महाकठीण आहे. नामसंकीर्तनाने ईश्वरप्राप्ती होत असली तरी नामसंकीर्तन हे ईश्वरप्राप्तीची तळमळ निर्माण करताना माणसाला वासना विरहित करून वैराग्य मार्गावर घेऊन जाते. त्यावेळी सर्व षड्‌रिपू गळून पडतात व ईश्वर प्राप्तीशिवाय अन्य कोणतीही विषय कामना व भाव शिल्लक राहात नाही. ईश्वर विषय नसल्याने ती कामना व भाव हे अनुक्रमे निष्काम व निरपेक्ष होतात. पण ईश्वरप्राप्तीची तळमळ अंतरंगातून व हृदयातून हवी. शिवाय प्राप्तीचा निश्चय व संकल्प हवा. प्रत्येक माणसाला हे शक्य नाही. म्हणून महाराज म्हणतात, **संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे। येर गबाळाचे काम नाही।।**. अध्यात्म विषयावरची पुस्तके वाचून, वेद, उपनिषदांतील मंत्र-स्तोत्र वाचून, ते मुखोद्‌गत करून, उपवास वा वार करून ईश्वरप्राप्ती होत नाही. ईश्वरप्राप्तीच्या मार्गावर मार्गस्थ होण्यासाठी सद्‌गुरू वाटाड्या आहे. त्याची सोबत करून स्वाध्याय, योग, नामसंकीर्तन आवश्यक आहे. त्यासाठी कठोर नामसंकीर्तन व साधना हवी. शिवाय ईश्वरप्राप्तीची आर्त तळमळ असणारा म्हणजेच साधनेने साध्य केलेल्या म्हणजे अनुभव व अनुभूतीधारक जातीतील व्यक्तींनाच ते शक्य आहे, अन्य लोकांना नाही, हे महाराज सांगत आहेत. परमात्म कृपेने सद्‌गुरू जंगलीदास माऊली अर्थात आत्मा मालिक यांचे कृपाछत्र आम्हा शिष्यांना लाभले आहे. गुरूपोर्णिमा पर्वसमयी त्यांच्या नित्यस्मरणी चरण कमलावर मस्तक ठेवून साष्टांग प्रणाम करतो.

**कृष्णार्पणमस्तु ।**
**आत्मा मालिक ।**

**- बंडोपंत कुलकर्णी,**
जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## गुरु गुण लिखा न जाय...

**गुरुशिवाय खराखुरा अनुभव नाही. योग-याग, विधी, कर्मकांड यांतून नाही सिद्धी प्राप्त होत. खोटा मान, बेगडी उपाध्या हे तर दांभिकांचे लक्षण! नितळ निर्मळ भाव सामर्थ्याने भगवंताची प्राप्ती शक्य आहे, नक्की आहे. तेज हीच तपस्विता. आत्म्याचे गुज केव्हाही हिताचे. साधुसंत, सज्जनांच्या संगतीला तरणोपाय नाही.. मुखी हरिनाम हेच ते सत्य. या पुण्याची गणती करावी ती कोणी आणि कशी! यामागे खरे रहस्य हेच की गुरुशिवाय अन् गुरु मार्गदर्शनाविना आत्मोन्नतीचा अनुभव तो काय?**

**-डॉ. सुनील शिंदे**

**सं**तश्रेष्ठ कबीरजींचा सद्‌गुरुंसंदर्भात विख्यात दाखला आहे, अवघ्या धरतीचा कागद.. वनराई अर्थात जंगलाची लेखनी आणि सप्तसमुद्राची शाई केली तरीदेखील गुरुगुण लिहिणे-गुरुमहिमा कथन करणे अशक्य आहे!

**सब धरती कागज करूँ, लिखनी सब बनराय।**
**सात समुद्र की मसि करूँ, गुरु गुण लिखा न जाय।।**

कबीरजी दार्शनिक होते. असामान्य कोटीतील संत महात्मा होते. त्यांच्या मृदु मुलायम, सोज्वळ स्वभावाला तोड नाही. संतत्वाच्या जेवढ्या काही कसोट्या असतील, त्या सर्वांवर उतरणारे ते असाधारण महात्मा होते. गुरुगुण वर्णन करणे जसे कठीण, अशक्य तसेच ते अनमोल जरुर! गुरुमहिमा थोर. गुरुस्तुती महान. गुरुथोरवी असामान्य. गुरुनाम असते आश्वासक, आधारभूत. हा गुरुमहिमा कागदावर थोडाच आटोक्यात येऊ शकेल?

गुरु आज्ञेची महतीदेखील असाधारण महाराज. जन्ममरणाचा फेरा दूर करणारी. मुक्तिप्रद. गुरु आज्ञेप्रमाणे वर्तन जीवनाला मार्गदर्शन ठरणारे. प्रेरणादायी आणि पथदर्शी.

**गुरु की आज्ञा आवै, गुरु की आज्ञा जाय।**
**कहैं कबीर सो संत हैं, आवागमन नशाय।।**

अंतर्बाह्य पावनपण प्रदान करणारे असतात सद्‌गुरूंचे आशीर्वाद. परीसाहून थोर महिमा सद्‌गुरूंचा. गुरु घेतात तरी काय? आणि घेऊन करणार तरी काय? खरेतर गुरुंसारखा दाता नाही. देणारा कोणी नाही. शिष्याचे शिष्यपण तरते-टिकते तेच मुळी विनम्रतेवर. तिन्ही लोकाच्या संपत्तीची मातब्बरी ती काय सद्‌गुरुंपुढे माउली!

**गुरु पारस को अन्तरो, जानत हैं सब सन्त।**
**वह लोहा कंचन करे, ये करि लये महन्त।।**
**गुरु समान दाता नहीं, याचक शीष समान।**
**तीन लोक की सम्पदा, सो गुरु दीन्ही दान।।**

संत कबीर महाराजांची वाणी रोखठोक. सडेतोड. सत्याची धगधगती मशाल. 'पोटात एक ओठात एक..' मामलाच नाही. 'कबीरा खडा बाजारमा। लिए लुकाठी हाथ। जो घर फुँके अपना चलै हमारे साथ!' एवढा तटस्थ भाव आणि परखडपणा संत कबीरजींचा. कबीरांचा जन्म वाराणसीचा. सन १३९८ मधला.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

पंधराव्या शतकातील विख्यात भारतीय रहस्यवादी संतकवी. भक्तिकालीन युगाचे, ईश्वर भक्तिचे क्रांतिकारी प्रवर्तक असा त्यांचा निर्देश केला जातो. त्यांच्या रचनांनी-दोह्यांनी भक्ती आंदोलनास प्रभावीत तर केलेच, पण वेगळी दिशाही दिली. कर्मकांड, अंधश्रद्धा या अपप्रवृत्तींवर त्यांनी प्रहार केले.

शीख धर्मियांच्या आदिग्रंथातही कबीरजींच्या रचना समाविष्ट आहेत. सद्‌गुरूंना कोटी प्रणाम-दंडवत असो, ही कबीरांची सोज्वळ सद्‌भावना :

**गुरु को कीजै दण्डवत, कोटि कोटि परनाम।**
**कीट ना जाने भ्रूंग को, गुरु करिले आप समान।।**

सद्‌गुरूंच्या मोठेपणाचे मोजमाप तरी कसे व्हावे महाराज! ते तर अशक्यच की. गुरु महानता-महिमा अनंत- अतुलनीय. त्यांचे उपकार थोर, अवर्णनीय.

**सतगुरु की महिमा अनंत, अनंत किया उपकार।**
**लोचन अनंत उघाड़िया, अनंत-दिखावनहार।।**

साक्षात भगवंत आणि गुरु समोर उभे ठाकले असता कुणाचे चरणस्पर्श आधी व्हावे, हे तर धर्मसंकटच! ज्यांच्या चरणी जीवनश्वास अर्पावा आणि जे आपल्याला ईश्वराचे दर्शन घडविण्यासाठी महत्तम सेतू होतात, ते अर्थातच सद्‌गुरु, त्यांचे चरण अनमोल -

**गुरु गोविंद दोऊँ खड़े, काके लागूं पांय।**
**बलिहारी गुरु आपने, गोविंद दियो बताय।।**

गुरुविना ज्ञान नाही. गुरुविना मोक्ष नोहे. गुरु सत्यान्वेषी. दोष दूर करणारे. गुरु आज्ञा तर प्रमाण असावी देवा. न मानाल-त्यागाल तर काळाशी गाठ समजा!

**गुरु बिन ज्ञान न उपजै, गुरु बिन मिलै न मोष।**
**गुरु बिन लखै न सत्य को, गुरु बिन मिटै न दोष।।**
**गुरु आज्ञा मानै नहीं, चलै अटपटी चाल।**
**लोक वेद दोनों गए, आए सिर पर काल।।**

सद्‌गुरू साक्षात महान दाता. गुरुसमान तुलनेत अन्य कोणता दाता नव्हे, त्रिलोकाची (तिन्ही लोकांतील) संपत्तीची ती काय मातब्बरी! तीही गुरुंच्याच दातृत्वाची देण... हे समजावून सांगताना कबीरदासजी म्हणतात-

**गुरु समान दाता नहीं, याचक सीष समान।**
**तीन लोक की सम्पदा, सो गुरु दिन्ही दान।।**

संतश्रेष्ठ कबीर महाराजांची गुरुथोरवी ही अशी. गुरुमहिमा अगाध-अनंत-अतर्क्य रुपे वर्णिला आहे त्यांनी. त्यांची तर्कशुद्ध भूमिका अवघ्या विश्वाला प्रेरणादायी-मार्गदर्शक ठरली.

भारतीय गुरुपरंपरा महान आहे. पथदर्शी-प्रेरणादायी आहे. विश्वाला मार्गदर्शक आहे, दिशादायी तसेच आत्मोन्नती साधणारी आहे. श्री गुरुदेवदत्तांपासून उन्नत असलेली आणि महर्षि वाल्मिकी, व्यास, अगस्त्यांपासून तर थेट नाथपरंपरा अन् संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव माउली, श्री रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्यापर्यंत पोचणारी समृद्ध आहे.

सद्‌गुरू परंपरा तसेच गुरुमहात्म्य अतुलनीय आहे. शेकडो-हजारो वर्षांपासून प्रवाही आहे.' सबसे बडा गुरु। गुरुसे बडा गुरु का ज्ञान।।' हे वचन विख्यात. माउली ज्ञानोबाराय यांनी 'गुरु सुखाचा सागरु। गुरु प्रेमाचा आगरु। गुरु घाली ज्ञानांजन। गुरु दाखवी निजधन' असा समर्पक दाखला दिलाय. संत मांदियाळीने गुरु महात्म्य अपार आत्मियतेने-आस्थापूर्वक वर्णिले आहे. संतांनी कथन केलेले सद्‌गुरु महात्म्य अवीट गोडवा घेऊन साकारले आहे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

गुरुशिवाय खराखुरा अनुभव नाही. योग-याग, विधी, कर्मकांड यांतून नाही सिद्धी प्राप्त होत. खोटा मान, बेगडी उपाध्या हे तर दांभिकांचे लक्षण! नितळ निर्मळ भाव सामर्थ्याने भगवंताची प्राप्ती शक्य आहे, नक्की आहे. तेज हीच तपस्विता. आत्म्याचे गुज केव्हाही हिताचे. साधुसंत, सज्जनांच्या संगतीला तरणोपाय नाही.. मुखी हरिनाम हेच ते सत्य. या पुण्याची गणती करावी ती कोणी आणि कशी! यामागे खरे रहस्य हेच की गुरुशिवाय अन् गुरु मार्गदर्शनाविना आत्मोन्नतीचा अनुभव तो काय, हे समजावून सांगताना माउली संत ज्ञानदेव (हरिपाठात) काय सांगतात पहा -

**योग याग विधी येणे नोहे सिद्धी। वायांचि उपाधि दंभ धर्म।।१।।**
**भावेवीण देव न कळे निःसंदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे ।।२।।**
**तपेवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त । गुजेवीण हित कोण सांगे।।३।।**
**ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात। साधूंचे संगती तरणोपाय।।४।।**
**हरि मुखें म्हणां हरि मुखें म्हणां। पुण्याची गणना कोण करी।।धृ।।**
**- संत ज्ञानेश्वर**

अनुभव जगाचा. अनुभव माणसांचा. अनुभव आत्म्याचा, अध्यात्माचा. हा अनुभव सद्‌गुरुंशिवाय व्यर्थ. अनुभवाची सत्यता लाभते ती गुरुंकडूनच हा भाव संत ज्ञानेश्वर माउली वरील अभंगाद्वारे उलगडून दाखवितात.

अद्वैत भाव तोलामोलाचा. रामकृष्णाठायी चित्त अन् श्रीविष्णूंचे-नारायणाचे सदैव स्मरण ही बाब माउली आवर्जून उल्लेखितात. गुरुशिवाय ज्ञान नोहेच अन्यथा भगवंताचे कीर्तन ते कसे घडावे! प्रपंची असता नामपाठाचे मौनही साधता यायला हवे, अर्थातच हे घडावे तेही गुरु मार्गदर्शनेच की.. यासंदर्भात माउली हरिपाठातच आणखी एक आधार देतात -

**विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान। रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें।।१।।**
**उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा। रामकृष्णीं पैठा कैसेनी होय।।२।।**
**द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान। तया कैचें कीर्तन घडे नामीं।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचे।।४।।**
**-संत ज्ञानेश्वर**

मच्छिंद्रनाथादि नवनाथांचे अन् एकूणच सकल सिद्धांचे सद्‌गुरु आदिनाथांपासूनची गुरुपरंपरा खुद्द संत निवृत्तिनाथ आणि माउली संत ज्ञानोबाराय आपल्या अभंगातून स्पष्ट करतात. ही परंपरा दोघांनी उलगडून दाखविल्याने निर्विवाद संदर्भस्रोत भाविकांसह अभ्यासकांना उपलब्ध झाला आहे.

आदिनाथ हे मच्छिंद्रनाथांचे गुरु. मच्छिंद्रनाथ हे गोरक्षनाथांचे गुरु अशी ही गुरुपरंपरा पुढे थेट निवृत्तीनाथांपर्यंत पोचते. गुरुपरंपरेच्या प्रसादाने-आशीर्वादाने शांती-सुखकारी अनुभूती, विरक्तीभाव यांचे सद्भाग्य प्रत्ययासी येते, ही जाणीव संत निवृत्तीनाथ पुढील अभंगाधारे प्रकट करतात -

**आदिनाथ उमा बीज प्रगटले। मच्छिंद्रा लाधले सहजस्थिति।।१।।**
**तेची प्रेममुद्रा गोरक्षा दिधली। पूर्ण कृपा केली गहिणींनाथा।।२।।**
**वैराग्ये तापला सप्रेमे निमाला। ठेंवा जो लाधला शांती सुख।।३।।**
**निर्द्वंद्व निसंक विचारता मही। सुखानंद ह्रदयि स्थिरावला।।४।।**
**विरक्तीचे पात्र अन्वयाचे मुख। येउनि सम्यक अनन्यता।।५।।**
**निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण। कुळ हे पावन कृष्ण नामे।।६।।**
**- संत निवृत्तीनाथ**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

संत निवृत्तीनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज आणि संत ज्ञानदेव दोघेही बंधू गुरुपरंपरेची थोरवी समन्वयरुपे, सम्यक भावनेतून अभिव्यक्त करतात. 'आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा' असा निर्देश करताना माउली आवर्जून आदिनाथांचे मुख्य शिष्य मच्छिंद्रनाथ, मच्छिंद्राने गोरक्षनाथास केलेला बोध तसेच गोरक्षनाथांनी गहिणीनाथांस दिलेला अनुग्रह आणि गहिणी कृपाप्रसादाने निवृत्तीस लाभलेला बोध असा एकूण प्रवास मांडतात. ही परंपरा थोर आहे, आदर्शभूत आहे. माउली आपल्या अभंगातून सांगतात -

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य।।१।।**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षाशी केला। गोरक्ष ओळला गहिणीप्रति।।२।।**
**गहिनी प्रसादे निवृत्ती दातार। ज्ञानदेवा सार चोजविले।।३।।**
**-संत ज्ञानदेव**

ज्ञानदेवादि भावंडांची कर्मकहाणी, तसेच सद्‌गुरुकृपेची महानता अलौकीक खरी. अखिल विश्वाला मार्गदर्शक अन् प्रेरणादायी. खरेतर विश्वातील संत-महंत, महात्म्यांनी गुरुपरंपरेची विशाल-महाकाय वटवृक्षासारखीच विस्तृत शाखाप्रणाली भक्तीक्षेत्रास बहाल केली आहे.

संत कबीरांचे दोहे अवघ्या जगाला शहाणपण देणारे. भक्तिमहिमा शिकवता शिकवता खाडकन डोळे उघडणारे. नवीन नजर देणारे. स्पष्ट-परखड-सडेतोड भूमिका मांडणारे.. या साऱ्या वैशिष्ट्यांसह उचित मध्य साधताना कबीरदासजी गुरुमहात्म्य वेगळ्या शैलीत कथन करताना दिसतात. कबीरांच्या अनोख्या वाणीतील गुरुविषयक थोरवी त्यांच्या नेहमीच्या शैलीनुसार वेधक आहे. सद्‌गुरुवीण कोण जगी वाट दाखवणार, मार्ग दाखविणार? असा प्रश्न करुन कठीण-क्लिष्ट-खडतर अशा यम घाटातून मार्ग काढू शकणारी खरी शक्ती ही सद्‌गुरुच होय असा विश्वास कबीर देतात. भ्रम भुलीची पहाडी, अहंकाराची लाट, कामक्रोधादि विकारांचे पर्वत, माया- मोहासह अन्य कठोर अडथळ्यांतून मार्गदर्शन करणारी सर्वश्रेष्ठ महाशक्तिशाली घटक अर्थात् व्यक्ती एकच, ती म्हणजे गुरू! काय म्हणतात संत कबीरजी यासंदर्भात पहा -

**गुरु बिन कौन बतावे बाट। बड़ा बिकट यम घाट।**
**भ्रान्ति की पहाड़ी, नदिया बीच में अहंकार की लाट।**
**बड़ा बिकट यम घाट...काम क्रोध दो पर्वत ठाड़े, लोभ चोर संघात।**
**बड़ा बिकट यम घाट...मद मत्सर की मेधा बरसत**
**माया पवन बह जाए बड़ा बिकट यम घाट...**
**कहत कबीर सुनो भाई साधो, क्यों तरना यह घाट**
**बड़ा बिकट यम घाट...**

संत ज्ञानोबारायांनी तर **'गुरु सुखाचा सागरु। गुरु प्रेमाचा आगरु। गुरु घाली ज्ञानांजन। गुरु दाखवी निजधन।'** असा यथोचित-नेमका गुरुमहिमा वर्णिला आहे.
संत महात्म्यांच्या नजरेतून 'गुरुमहात्म्य' हे असे आहे.

**- डॉ. सुनील शिंदे**
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
ए-१, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## परब्रम्ह स्वरुप श्रीगुरू

विष्णूअवतार श्रीरामाने वशिष्ठ तर श्रीकृष्ण अवतारात सांदिपनी ऋषींना गुरु केले व त्यांचा नितांत आदर करून त्यांच्याकडून गुरुकुलात विद्या, ज्ञान संपादित केले. संत सांगतात आपल्या पूर्व-सकृतानुसार हा प्राप्त झालेला मनुष्यदेह दुर्लभ आहे. तो प्राप्त झाल्यावर पारमार्थिक जीवनात संतांच्या सहवासात सत्संगतीमधून मुमुक्षू भक्ताची गुरुशी भेट होते. ही गुरुभेट  मोठी भाग्याची आहे. श्रीगुरू भक्ताचे असलेले अज्ञान दूर करुन त्याला ज्ञानाचा प्रकाश देतात.

**- बी. के. गायकवाड**

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु। गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात परब्रह्म। तस्मै श्री गुरुवे नमः।।**

संत सांगतात ८४ लक्ष योनींच्या फेऱ्यांमधून या जगी मानव जन्म प्राप्त होतो. ईश्वराने मानवास दिलेल्या सद्‌बुद्धी, विवेकाच्या आधारे जीवाने आपले आत्मकल्याण करावे. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होण्यासाठी अनन्यभावे श्री गुरुचरणी शरण जावे. जीवाला मोक्षप्राप्ती करून देणारे परब्रह्मस्वरुप श्रीगुरू आहेत.

परमात्मा ईश्वर संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता, नियंता व एकमेव आधार आहे. सृष्टीरचियेता परमात्म्याने वेळोवेळी जगत्‌रक्षणासाठी अनेक अवतार धारण केले आहेत. या सगुणस्वरूप देवदेवतांनी अवतार कार्यात सृष्टीचे पालनपोषण करीत सज्ञनांचे रक्षण आणि दुर्जनांचा संहार केला. महर्षी नारदमुनी व अन्य ऋषीमुनींनी जगतकल्याणाचे ईश्वरी कार्य केले. नारदमुनींनी आपल्या नवविधा भक्तितून ईश्वराचा भक्तिमार्ग प्रशस्त केला आहे.

जसे देव-देवतांचे सगुण अवतार झाले, तसेच संत सद्‌गुरुंचे अवतारही जगतकल्याणाप्रित्यर्थ झाले आहेत. महर्षी श्रीव्यास यांनी श्री गणेशाच्या सहाय्याने वेद, पुराणे, महाभारत, श्रीमद्‌भागवत कथा या ग्रंथांचे लिखाण करून समस्त मानव कल्याणासाठी उपलब्ध करून दिले. वेद हे अपौरुषीय आहेत. ईश्वरस्वरूप ज्ञान समग्र सृष्टी विज्ञान या ग्रंथात आहे. त्यासाठी हे जग व्यासांचे उष्टे आहे, असे म्हटले जाते.

महर्षी व्यास यांच्या या महान कार्यासाठी त्यांना प्रथम आद्यगुरू म्हणून वंदन करण्यात येते. आषाढ मासातील पौर्णिमेस व्यास पौर्णिमा म्हणून ओळखले जाते. मानवी जीवनात गुरुंचे **स्थान महान आहे. गुरू परब्रह्मस्वरूप आहेत.**

**'श्री गुरु हरि हर विरंची जाण।**
**स्वरुप तोचि नारायण। मन करुनी निर्वाण।**
**सेवा करावी भक्तिने।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

विष्णूअवतार श्रीरामाने वशिष्ठ तर श्रीकृष्ण अवतारात सांदिपनी ऋषींना गुरु केले व त्यांचा नितांत आदर करून त्यांच्याकडून गुरुकुलात विद्या, ज्ञान संपादित केले. संत सांगतात आपल्या पूर्व-सकृतानुसार हा प्राप्त झालेला मनुष्यदेह दुर्लभ आहे. तो प्राप्त झाल्यावर पारमार्थिक जीवनात संतांच्या सहवासात सत्संगतीमधून मुमुक्षू भक्ताची गुरुशी भेट होते. ही गुरुभेट मोठी भाग्याची आहे. श्रीगुरू भक्ताचे असलेले अज्ञान दूर करुन त्याला ज्ञानाचा प्रकाश देतात. प्रपंच मायेत गुंतलेल्या मनाची त्यातील आसक्ती कमी करून परमार्थाची, ईश्वर भक्तिची आवड निर्माण करतात.

आपले याआधी अनेक जन्म झालेले असून, वेगवेगळ्या देहधारणेतून 'मी' म्हणजे एक देहधारी ही देहबुद्धी दृढ झालेली असते. श्रीगुरु या देहबुद्धीचे निरसन करून आत्मबुद्धीची वृद्धी करतात. मी कोण आहे? माझे सत्य स्वरूप काय आहे, याचे ज्ञान श्रीगुरूंकडून जीवाचा उद्धार झाल्यावर मुमुक्षू भक्ताला होते. यासाठी जीवनात संतसंगती, संत सहवास आणि गुरुंचे मार्गदर्शन यांची नितांत गरज असते. श्रीगुरू भक्ताकडून योग्यतेनुसार अनुष्ठानाद्वारे साधना करवून घेतात. साधनेद्वारे जीवाची विषयाची आसक्ती कमी होते. सात्विक आहार व उपवासाने देहशुद्धी होते. मनातील वासना निर्मूलन झालेने मन-चित्तशुद्धी होते. भक्ताला ईश्वर भक्तीची ओढ लागते. चित्तवृत्ती भगवंतमय होते. सर्वांठायी एकच परमात्मा अनेक रुपाने व्यापून उरला आहे. जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत ही वृत्ती होते.

श्री सद्गुरूंवर नितांत श्रद्धा ठेवावी. श्रीगुरुंची अंतःकरणपूर्वक नित्य मानसपूजा करावी.

**ध्यान मूलं गुरुमूर्ती। पूजा मूलं गुरुपादुका।**
**मंत्र मूलं गुरुवाक्यं। मोक्ष मूलं गुरुकृपा।।**

श्रीगुरुंनी दिलेली साधना, नाममंत्र, एकाग्र चित्ताने केलेली ध्यानधारणा यातून भक्ताला आपल्या देहमंदिरी असलेल्या आत्मस्वरुपाची जाणीव होते. श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात, जोपर्यंत मनुष्यास श्रीगुरुभेट होत नाही, तोपर्यंत श्रीमद्भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, श्रीमद्भागवत, तुकाराम गाथा यांसारखे ग्रंथ 'ग्रंथ हेच गुरू' म्हणून अभ्यासावेत.

पारमार्थिक दृष्टीने उन्नत झालेल्या जीवाला या संसाररुपी महासागरातून सुखरूप पैलतिरी नेण्याचे काम परब्रह्मस्वरूप सद्गुरू करतात. श्रीगुरुंना अनन्यभावे शरण जावे. श्रद्धेने अंतःकरणपूर्वक निस्सीम भक्ती करावी. श्रीगुरुभक्ती हीच ईश्वरभक्ती होय.

देवाधिदेव महादेव पार्वती मातेला सांगतात. श्री गुरुभक्तीतून भक्ताचा उद्धार होतो.

**'गुरोःकृपाप्रसादेन, आत्मारामं निरीक्षेयत।**
**अनेन गुरुमार्गेण स्वात्मज्ञानं प्रवर्तते।'**
**- गुरुगीता**

श्री गुरूभक्तीत ज्ञान-विज्ञानासह भक्ताला सर्वकाही प्राप्त होते.

चंद्रदर्शने ताप (त्रिविध ताप) जाती, गंगादर्शने पापे जाती, श्रीगुरुदर्शने ताप, पाप, दैन्य जाती'

इ. स. १३०० मध्ये संत ज्ञानेश्वरांनी बंधू निवृत्तीनाथ यांच्या आज्ञेवरून परमात्मा कृष्णाने सांगितलेली श्रीमद्भगवत गीता मराठीतून ज्ञानेश्वरीच्या रुपाने सामान्यांसाठी उपलब्ध करून दिली व त्यातील ज्ञान, भक्ती आणि सात्विक कर्माचरण याद्वारे मनुष्याने गुरुचरणी शरण जाऊन जीवाचा

उद्धार करून घ्यावा. सत्कर्मे करून फळाची अपेक्षा न ठेवता ती ईश्वरचरणी समर्पित करावीत. कर्तेपणाचा अहंकार ठेवू नये, ही कर्मे निष्काम कर्मे होऊन भक्ताला सुख-दुःखाच्या बंधनातून मुक्त करून जीवन्मुक्त म्हणजे मोक्षास सहाय्यभूत होतात.

संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात-


**'श्री गुरुसारिखा असता पाठिराखा।**
**इतरांचा लेखा कोण करी ।।१।।**
**राजयाची कांता काय भीक मागे।**
**मनाचिये जोगे सिद्धी पावे ।।२।।**
**कल्पतरु तळवटी जो कोणी बैसला।**
**काय वाणी त्याला सांगिजो जी।।३।।**
**ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो**
**आता उद्धरलो गुरुकृपे।।४।।**

संत ज्ञानेश्वर, श्री जगद्‌गुरू तुकाराम महाराज, श्रीसमर्थ रामदास स्वामी, साईबाबा, संत गाडगेबाबा या व अनेक संत महात्म्यांनी आपले संपूर्ण आयुष्य जगदकल्याणासाठी वेचले. मनुष्याला आपल्या जीवनात शाश्वत सुख समाधान मिळावे यासाठी या सर्व संतांनी महान कार्य केले आहे. हे सर्व मानवास श्रीगुरूस्थानी आहेत. गुरुपपौर्णिमेनिमित्त या सर्वांच्या चरणी विनम्र वंदन.

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण येथे येत्या दि. १८ ते २१ जुलैदरम्यान होणाऱ्या आत्मा मालिक गुरुपौर्णिमा महोत्सवासाठी अनेक आत्मप्रेमी भक्तभाविकांची मांदियाळी सद्‌गुरूदर्शन गुरुचरणांच्या पूजेसाठी कोकमठाण आश्रमी येतात. सोहळ्यास येणाऱ्या सर्व भाविकांची प्रसादभोजन आणि निवासाची सोय आश्रमाचे, आत्मामालिक, ध्यानपीठाच्या वतीने विनाशुल्क करण्यात येते.

**- बी. के. गायकवाड**
प्लॉट क्र. ५, नवमहाराष्ट्र को. ऑप. हौसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे ०९, मो. नं. ९४०३०२६१६४

***




सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

## आध्यात्मिकता और आज का दौर



**अध्यात्म कोई कोर्स करने की चीज नहीं है, यह ठीक है; कि हम प्राणायाम को सीख सकते हैं, प्राणायाम का अभ्यास कर सकते हैं, लेकिन मेडिटेशन जिसे ध्यान कहते हैं, वह किसी के सिखाए जाने से नहीं आता, धीरे-धीरे वह विकसित होता है। लोग भ्रम में रहते हैं, आंख बंद कर दिया, कोर्स कराने वाले कहेंगे आपका ध्यान बहुत अच्छा चल रहा है। उन्हें तो पैसे कमाने हैं, लेकिन आप खुद को आँकिए क्या सच में महसूस हो रहा है कि आपकी ध्यान की अवस्था है? आंख बंद करके बैठना एक स्थिति है, पर वह ध्यान नहीं है। जब ध्यान आपका वास्तव में होने लगेगा, तो आपको खुद ही पता चल जाएगा।** **-नीता नरेश यादव**

**डगर कठिन हो मंज़िल की, हो चलना दुश्वार,**
**छत्र सजाओ आत्म रूप का, हो निर्भयता से पार,**
**आत्म धरा पर ध्यान को बोया, ब्रह्म से इसे रिझाया है,**
**सींचा इसको गुरु मंतर से, फिर हर साज सजाया है।**

शिक्षा प्राप्त करने के लिए जैसे नर्सरी से ग्रॅज्युएशन तक या आगे कक्षाओं की सीक्वेंस बनी है, और हम उस सिस्टम से आगे बड़ते है, पर उसे ग्रहण करने का भाव स्वयं से आता है, इसी तरह सद्गुरु के चरणों में रहने का भाव कैसे आए यह कोई सिखा नहीं सकता, वह अंतर्मन से स्वयं पैदा होता है। हाँ आस पास का परिवेश ज़रूर इसमें हमारी मदद करता है, किंतु यह आज फ़ैशन की तरह भी फैल गया है। आज कल  लोगों को शौक हो गया है कोर्स कर लो, तमाम संस्थाएं ऐसे दावा करने लगीं हैं कि  मेडिटेशन से हम आपकी कई तरह की बीमारियों को ठीक कर देंगे। तरह तरह के ऐसे-वैसे कई कोर्स कराते है, मेडिटेशन का शाब्दिक अर्थ क्या है? ध्यान करना! पर किस चीज का ध्यान करना, कभी सोचो गहराई से, इस तरह की कई आपसी सामंजस्य की विधियाँ अलग अलग है, जैसे प्राणायाम करना और ध्यान करना दो अलग-अलग चीजे हैं। पहले पहले जब हमारी जिज्ञासाएँ जागीं, हमने सुना था पुराने समय में लोग प्राणायाम करते थे और उसके बाद धीरे-धीरे ध्यान की ओर बढ़ते थे। आजकल मेडिटेशन के नाम पर बड़े-बड़े कोर्स कराए जाते हैं, लेकिन इसके बावजूद आप उस स्थिति को नहीं प्राप्त कर पाते हो जिसे वास्तविक ध्यान कहते हैं। इधर कोर्स किया उधर गपशप या दुकान चालू!

अध्यात्म कोई कोर्स करने की चीज नहीं है, यह ठीक है; कि हम प्राणायाम को सीख सकते हैं, प्राणायाम का अभ्यास कर सकते हैं, लेकिन मेडिटेशन जिसे ध्यान कहते हैं, वह किसी के सिखाए जाने से नहीं आता, धीरे-धीरे वह विकसित होता है। लोग भ्रम में रहते हैं, आंख बंद कर दिया, कोर्स कराने वाले कहेंगे आपका ध्यान बहुत अच्छा चल रहा है। उन्हें तो पैसे कमाने हैं, लेकिन आप खुद को आँकिए क्या सच में महसूस हो रहा है कि आपकी ध्यान की अवस्था है? आंख बंद करके बैठना एक स्थिति है, पर वह ध्यान नहीं है। जब ध्यान आपका वास्तव में होने लगेगा, तो आपको खुद ही पता चल जाएगा। उसका वर्णन दूसरों के अनुभव से या दूसरों के बताए जाने से हम नहीं समझ सकते हैं.

अध्यात्म के रास्ते में खुद ही बैठना, खुद ही सोचना, खुद को ही परिष्कृत करना, खुद को परिमार्जित करना और उसे विकास की ओर जहां तक हमारी एकाग्रता उस ईश्वर के साथ एकाग्रित हो सके,

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

का प्रयास करना पड़ता है। विनती करनी पड़ती है अपने गुरु से कि हम पर कृपा कीजिए। हमेशा शरण में लीजिए; हम पर दया कीजिए; हमें अपने श्री चरणों में रखिए। इस तरह की निरंतर प्रार्थना करने पर गुरु की कृपा से हम इस पथ पर आगे बढ़ सकते हैं। सच्चे अर्थों में ध्यान की अवस्था को गुरूकृपा में निरंतर अभ्यास से ही पाया जा सकता है। यहीं से हमारे अंदर अध्यात्म का दौर शुरू सकता है, फिर वह आज का दौर हो या आने वाले कल का, अध्यात्म हमेशा जीवंत रहेगा। (यह लेख विद्या भारती के द्वारा राष्ट्रीय स्तर पर आध्यात्मिक और आज का दौर विषय पर आयोजित लेख प्रतियोगिता में मध्य प्रदेश में राज्य स्तर तक प्रथम स्थान पर चयनित है, इसके लिए नीता यादव को गुरु कृपा में प्रथम पुरस्कार नगद राशि के साथ प्राप्त हुआ है, जो सद्गुरूदेव को समर्पित किया गया) - आत्मा मालिक

**गुरु चितवन को गौर कर, बड़े कदम चहूँ ओर।**
**गुरु कारज गुरु चित रखे, जन्म जन्म की ठौर ।।**

अतः: सद्गुरु की महिमा को अपरंपार कहा गया है। इसका आत्मा के निम्मित से लेकर परमात्मा के मार्ग दर्शन तक, इसका कोई सानी नहीं है। हम भाविकों के निमित्त भी मनीषियों ने गुरु के प्रति समर्पण का महत्व बहुत ही गहराई से बताया है और कहा है कि मानव जीवन में जीवन लक्ष्य तभी पाया जा सकता है, जब गुरु का आश्रय मिले। जिनके पास यह आश्रय नहीं है, उन्हें सामान्य मानव श्रेणी से अलग रख कर निगुरा भी कहा गया है। तथा जिनके गुरु है; उनको नियम दिया गया है कि महीने में कम से कम एक बार पूर्णिमा के समय अपने गुरु के दर्शन अवश्य करें और सांसारिक परेशानियों या अन्य कारणों से ऐसा संभव नहीं हो तो थोड़ा अंतराल बड़ा सकते है, और यह भी संभव ना हो सके तो; साल में एक बार गुरु पूर्णिमा के समय गुरु दर्शन और आशीर्वाद अवश्य लें। यही मानव जीवन को पूर्णता को ओर ले जाएगा. यह बात हमारे लिए गुरु पूर्णिमा के महत्व की चिन्हित करती है।

काव्य हमारी संस्कृति में बहुत बड़े प्रेरणा स्रोत रहे हैं। कुछ काव्य जो हमारी लेखनी में सद्गुरु कृपा से उदित हुए हैं, आपको सद्गुरु मुख होकर उनकी महिमा में प्रेरित करेंगे, यहाँ गुरु रस के रूप में प्रस्तुत हैं

**गुरु-रस**

**हम तुम सारे जगत में, कुछ क्षण काटन आये ।**
**जब हम सद्गुरू सांध ले, खुद ही क्षण बन जायें ।।**
**ओस बूँद सी जिंदगी, क्षणिक सुखद अहसास।**
**आत्म ध्यान करके सदा, रहो सद्गुरु के पास।।**
**गुरु मंत्र के जाप से, करो कलुष का नाश।**
**देह तपा लो अग्नि सी, जैसे फाग पलाश।।**
**क्या गंगा क्या गोमती, बद्री-गया-कैलाश ।**
**सद्गुरु में जब रम गया, सब कुछ तुमरे पास ।।**
**गुरु चरनन को पाये के, सुध भूलत संसार ।**
**सतगुरु बनता साहिबा, पूर्ण जगत परिवार ।।**

**गुरु पूर्णिमा के अवसर पर समस्त गुरु भाई-बहनों और संत जनों को हमारी ओर से बहुत बहुत हार्दिक हार्दिक शुभकामनाएँ ।**

**- नीता नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.




* प्रेषक *

संपादक, मासिक ॐ गुरुदेव

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी–कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)–४२३६०१